राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखाली खोल सागरातील मासेमारीसाठी मध्यम आकाराच्या नौका बांधण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करणे.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. मत्स्यवि १०९५/[१४७]/पदुम-१४
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ जानेवारी, १९९७

पहा :- १] आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचे पत्र क्र. ०६११०१/२३०९५, दि. ३१ ऑक्टोबर, १९९५.
२] राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एनसीडीसी-५-१२/७६/फिश, दि. ३१ ऑक्टोबर, १९९५.
३] शासन निर्णय क्र. रासनि १२९३/[१५९]/पदुम-१४, दि. ८ जानेवारी, १९९६
४] शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. रासनि ११९६/१३४३०/[२२३]/पदुम-१४, दि. ४.११.१९९६.
५] शासन ज्ञापन, कृषि व पदुम विभाग क्र. बीजीटी १०९६/ २७२७१ [२३६]/९६/पदुम-१६, दि. २ जानेवारी, १९९७.

प्रस्तावना :-

राज्याच्या सागरी किनाऱ्यावर सध्या स्थानिक मच्छिमार, यांच्याकडे उपलब्ध असलेल्या १३.५ मी. लांबीच्या नौकांच्या सहाय्याने सर्वसाधारणतः ७०-७५ मीटर खोल समुद्राच्या क्षेत्रात मासेमारी करीत असतात. हे मासेमारीचे क्षेत्र किनाऱ्यापासून सर्वसाधारणतः ३५-४० कि.मी. लांब असते. या क्षेत्रात मासेमारी करणाऱ्या नौकांवर १०० अश्वशक्तीचे इंजिन असल्यामुळे तसेच नौकांचा आकार, नौकांची समुद्रात रहाण्याची कमाल क्षमता, मासळी साठवणुकीची क्षमता इ. बाबी विचारात घेतल्या असता, राज्यातील मच्छिमार या क्षेत्रापलिकडे मासेमारीसाठी जाऊ शकणार नाहीत. या क्षेत्रापलिकडे, मच्छिमारांना मासेमारी करावयाची झाल्यास नौकांच्या आकारात, इंजिनच्या अश्वशक्तीच्या आकारात वाढ करणे आवश्यक आहे. म्हणून सध्याच्या नौकेच्या आकारापेक्षा [१३.५ मीटर लांबीच्या] मोठ्या आकाराच्या मध्यम नौका [ऑफशोअर व्हेसल्स] बांधण्यासाठी सहकारी संस्थांना/गटांना अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

२. शासन आता असे आदेश देत आहे की, राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी सहमती दिल्याप्रमाणे, खोल सामुद्रातील मासेमारी करण्यासाठी १४.५ मीटर ते १६

अश्वशक्तीचे इंजिन असलेले व इतर अत्याधुनिक उपकरणे खरेदीसाठी, मच्छिमार सहकारी संस्थेस/गटास, राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखाली अर्थसहाय्य मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे. सदरहू अर्थसहाय्य राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेंतर्गत "मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण" या प्रचलित योजनेखाली देण्यात यावेत. खोल समुद्रातील मासेमारी करण्यासाठी सहकारी संस्थेस किंवा गटास मध्यम आकाराची नौका [ऑफ शोअर व्हेसल्स] बांधण्यासाठी भावयाचे अर्थसहाय्याचे स्वरूप, शासन निर्णय क्र. रासनि १२९३/[१५९]/पदुम-१४, दि.८ जानेवारी, १९९६ अन्वये विहित केलेल्या आकृतीबंधानुसार [पॅटर्न] लागू राहील. सदरहू आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| अ] राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून राज्य शासनास अर्थसहाय्य. | ८० टक्के: कर्ज |
| ब] राज्य शासनाकडून सहकारी संस्थेस अर्थसहाय्य: | ५५ टक्के कर्ज. |
| | ५ टक्के भागभांडवल |
| | ३० टक्के शास विमोचक भागभांडवल [२० टक्के रा.स.वि.नि. हिस्सा +१० टक्के राज्य हिस्सा] |
| एकूण : | ९० टक्के. |
| | १० टक्के सहकारी संस्थेने/गटाने स्वत: गुंतविणे. |

३. शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्र. एनसीडी २०८७/७२७१/सीआर ४२/फिश-२, दि. २८ मार्च, १९८८ सोबत जोडलेल्या जोडपत्रानुसार, मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण योजनेंतर्गत करावयाच्या कार्यवाहीची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्यातील अ.क्र.१ वगळता, इतर शर्ती व अटी यासाठी लागू ~~राहतील~~ राहती व त्याचे काटेकोरपणे पालन करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. तसेच अर्थसहाय्याची प्रकरणे हाताळतांना, खालील विहित अटींचीही पूर्तता करण्याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी :-

[१] गट पुरस्कृत करणाऱ्या मच्छिमार सहकारी संस्थेला/यापूर्वी शासनाने विविध योजनांखाली दिलेल्या कर्जाची दि. १ एप्रिल रोजीची वसुली ७५% पेक्षा जास्त असावी.

[२] पुरस्कृत गटात २ प्रशिक्षित सदस्य [मत्स्यव्यवसाय विभाग, आयटीआयचा डिझेल मेकॅनिकल ट्रेड प्रमाणपत्र तथा सिफनेट कोचीन संस्थेचे

प्रशिक्षण असणे तथा एकूण गटाची संख्या १२ असणे आवश्यक राहील.

३] प्रस्तावित नौकेमध्ये १० टन क्षमता असलेले शीतकप्पे राहतील.

४] गटाने निवडलेल्या प्रशिक्षित सदस्यांना, एको साऊंडर, जीपीएस, तथा दूरसंचार यंत्र वापरण्याचे प्रशिक्षण, गट मंजूर झाल्यापासून नौका बांधण्यापूर्वी पूर्ण करावे लागेल.

५] शासनाच्या इतर कोणत्याही योजनेअंतर्गत प्रस्तावित गटाने अर्थसहाय्य घेतले असेल व त्यास मोठ्या आकाराची नौका बांधावयाची असेल तर त्यांनी पूर्वी घेतलेल्या अर्थसहाय्याची संपूर्ण रक्कम [कर्ज अनुदान अथवा भागभांडवल] व्याजासहित शासनास परत करणे आवश्यक राहील.

६] सदर योजनेअंतर्गत मंजूर केलेली कर्जाची रक्कम प्रस्तुत प्रकल्प गटास शासनाने मंजूर केलेल्या अर्थसहाय्याच्या दिनांका पासून जास्तीत जास्त १२ महिन्यांचे आत गट कार्यान्वित करावा लागेल. प्रकल्पांतर्गत दिलेल्या कर्जाची रक्कम प्रकल्प सुरु झाल्यानंतर १ वर्षाच्या कालावधी पासून प्रत्येक वर्षी आठ समान हप्त्यांत [ जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर हे महिने वगळून ] व्याजाच्या हप्त्यासह भरावी लागेल. व्याजाचा दर राष्ट्रीय सहकार विकास निगमने प्रतिवर्षी निर्धारित केलेल्या दरापेक्षा अर्धा टक्का जास्त असेल. गटास मंजूर केलेल्या कर्जाची [मुद्दल व व्याजासह ] संपूर्ण परतफेड ८० समान हप्त्यांत करावी लागेल.

७] गटास नौकेच्या संपूर्ण किंमतीचा विमा प्रत्येक वर्षी मासेमारी हंगाम सुरु होण्यापूर्वी काढावा लागेल. त्याचप्रमाणे नौकेवरील सर्व खलाशांचा प्रत्येकी किमान १ लक्ष रु. चा विमा देखिल काढणे नौका मालकास बंधनकारक असेल.

८] प्रस्तुत नौका, ही शासनाने विहित केलेल्या बंदी कालावधीत [१० जून ते १५ ऑगस्ट किंवा नारळी पौर्णिमा पर्यंत ] मासेमारी करु शकणार नाही.

९] मच्छिमार सहकारी संस्थेने पुरस्कृत केलेल्या गटास यांत्रिकी नौका बांधण्या साठी अर्थसहाय्य मंजूरीची स्वीकृती कळविल्यानंतर, संबंधित गटाने त्यांच्या हिश्श्याची प्रकल्प किंमतीच्या १० टक्के रक्कम नौका बांधून पूर्ण झाल्यानंतर, एको साऊंडर, जीपीएस, दूर संवेदन यंत्र, मासेमारीसाठी लागणारी आवश्यक जाळी इ. वस्तू खरेदी करुन प्रकल्पातील स्वतःच्या हिश्श्याच्या रकमेची भरपाई करावी. सदर नौकेव्दारे ट्रॉल मासेमारी तथा गळाच्यापध्दतीने

मासेमारी करणे अपेक्षित आहे. संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी संस्थेने पुरस्कृत केलेल्या गटास मंजूर करण्यात येणाऱ्या ९० टक्के अर्थसहाय्यापैकी, ३० टक्के खास विमोचक भागभांडवल आणि ५ टक्के भागभांडवल याप्रमाणे ३५ टक्के रक्कम, संबंधित संस्था/नौका बांधण्यासाठी उपलब्ध करावी. सदर रक्कम, नौका बांधण्यासाठी खर्च करुन नौकेचे बांधकाम ३/४ पर्यंत झाल्यानंतर, ५५ टक्के कर्ज रक्कमेपैकी २० टक्के रक्कम, सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी नौकेचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी उपलब्ध करावी. उर्वरित ३५ टक्के रक्कम, १५० ते २०० अश्वशक्तीचे इंजिन बसविणे, नौकेवर मासळी साठविण्यासाठी शीतकप्प्यांची व्यवस्था करणे, नौकेवर अत्याधुनिक उपकरणे, इकोसाउंडर, जीपीएस, रेडीओ टेलिफोन, जाळी खरेदी इत्यादीसाठी [संबंधित गटाने प्रकल्प खर्चाच्या १० % रक्कम उपलब्ध केल्याची खात्री करुन ] संबंधित पुरवठादारांना सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी परस्पर अदा करावी.

१०.] ३० टक्के खास विमोचक भागभांडवलाचे १२ वर्षात पूर्ण कर्ज फेडीनंतर, गटास अनुदान म्हणून रूपांतरीत करण्यात यावे, ५ टक्के भाग भांडवल म्हणून संबंधित संस्थेला मंजूर केलेली रक्कम; संस्थेने संबंधित गटास कर्ज म्हणून द्यावी. आणि सदर रक्कम १२ वर्षात गटाकडून वसूल करावी आणि हे ५ टक्के भागभांडवल १२ वर्षानंतर [ प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे] संस्थेने शासनास परत करावे. याबाबत शासन पत्र क्रमांक-रासनि-१२९०/ ४४०५०/ ४२८/ पदुम-१४, दिनांक १५ जानेवारी, १९९२ चे अवलोकन करावे.

४. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी राज्यातील मच्छिमारांना सहकारी संस्थे मार्फत प्रतिवर्षी आठ नौकांसाठी राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखाली अर्थसहाय्य देण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा.

५. यासाठी राज्यहिश्यापोटी उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून रु. २४.८० लाख इतका निधी सदर योजनेकरिता लाक्षणिक पूरक मागणी द्वारे मंजूर झालेल्या अनुदानातून संबंधित लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा. तसेच या योजनेचा इतर खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

अ] ४४०५-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च -१९१-मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था[दोन] पंचवार्षिक योजनांतर्गत यो[illegible] राज्य योजनांतर्गत योजना][दोन ] [दोन ] यांत्रिकी नौका [illegible] हिस्सा [४४०५०१३२]

ब] ४४०५–मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च–१९१ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था [दोन] पंचवार्षिक योजना [राज्य यो.यो.] [दोन] [तीन] यांत्रिक नौका रा.स.वि.नि. हिस्सा [४४०५०१९८]

क] ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च– १९१ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था [दोन] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [राज्य योजनांतर्गत योजना] [दोन] [दहा] यांत्रिक नौका– रा.स.वि.नि. हिस्सा [४४०५०५५१]

ड] ६४०५ मत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे १९० [दोन] [४७] यांत्रिक नौका– रा.स.वि.नि. हिस्सा [६४०५००८१]

६. हे आदेश नियोजन विभाग/वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३५८/९६/व्यय–१, दिनांक ३/८/१९९६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ वि. रा. खेरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
जिल्हाधिकारी आणि सदस्य सचिव जिल्हा नियोजन व विकास मंडळ, मुंबई/बृहन्मुंबई/अलिबाग [रायगड]/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे.
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई
सहायक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई/पालघर [जिल्हा ठाणे]/अलिबाग, रत्नागिरी/मालवण [जिल्हा सिंधुदुर्ग]
महानिबंधक सहकारी संस्था [दुग्ध] वरळी, मुंबई.
** सहायक निबंधक सहकारी संस्था [दुग्ध] अलिबाग/ठाणे/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
महालेखापाल, महाराष्ट्र–१ [लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता] मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र–२ [लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता] नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखाधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
उपकोषागार अधिकारी [पालघर] जिल्हा ठाणे/मालवण [जिल्हा सिंधुदुर्ग]
नियोजन विभाग / वित्त विभाग [व्यय–१/अर्थसंकल्प–१४]
सर्व अधिकारी [पदुम विभाग] कृषि व पदुम विभाग
महाव्यवस्थापक राष्ट्रीय सहकार विकास निगम, ४ सिरी इन्स्टिट्यूशनल एरिया, हौज खास, नवी दिल्ली
प्रादेशिक उपसंचालक [पश्चिम] राष्ट्रीय सहकार विकास निगम, १७ महात्मा गांधी रोड, पुणे.
कार्यासन पदुम–१२/पदुम–१३/पदुम–१६ / – निवड नस्ती.

** विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था [दुग्ध] कोकण भवन, नवी मुंबई.